**गांधी रिसर्च फाउंडेशनच्या गांधी विचार संस्कार परीक्षेस आपल्या शाळा-महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी बसविण्याबाबत**

**रयत शिक्षण संस्था, सातारा**
माध्यमिक आस्थापना विभाग,
परिपत्रक क्र.१२ दिनांक १ जून २०१७

**सर्व शाखाप्रमुख,**
प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, आश्रमशाळा व महाविद्यालये
रयत शिक्षण संस्था

विषय :- गांधी रिसर्च फाउंडेशनच्या गांधी विचार संस्कार परीक्षेस आपल्या शाळा-महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी बसविण्याबाबत.
संदर्भ :- मा. चेअरमन, गांधी रिसर्च फाउंडेशन यांचे दि.२४ एप्रिल २०१७ चे पत्र

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, वर्ष **२०१८-१९ हे महात्मा गांधी यांचे १५० व्या जयंतीचे व रयत शिक्षण संस्थेचे शताब्दी वर्ष आहे.** कर्मवीर अण्णांची महात्मा गांधीजींच्या प्रति असलेली श्रद्धा व त्यांचा अतिंम क्षणी केलेला संकल्प यांचा विचार करता गांधी रिसर्च फाउंडेशनच्या गांधी विचार संस्कार परीक्षेस आपल्या शाळा-महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी बसविण्याबाबत वरील संदर्भाने कळविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र. संकीर्ण २०१४ (२६/१४), एसडी-६, शालेय शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक १४ जून २०१४ द्वारे सर्व शाळांनी गांधी रिसर्च फाउंडेशनच्या गांधी विचार संस्कार परीक्षेस अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी करावे अशी सूचना केली आहे.

तरी रयत शिक्षण संस्थेच्या सर्व प्राथमिक शाळा, माध्यमिक-उच्च माध्यमिक विद्यालये व महाविद्यालय यांना सूचित करण्यात येते की, आपल्या शाखेतील सर्व विद्यार्थ्यांना या परीक्षेस बसवावे. तसेच या पुढेही दरवर्षी गांधी विचार संस्कार परीक्षा आपल्या शाळा-महाविद्यालयातून घेण्यात याव्यात. याबाबतचा अहवाल संस्थेच्या विभागीय व मुख्य कार्यालयाला २ ऑक्टोबर पर्यंत पाठवावा.

गांधी रिसर्च फाउंडेशनच्या गांधीतीर्थ, जैन हिल्स येथील म्युझियमला आपल्या शाखेच्या शिक्षक-शिक्षकेतर सहकारी, विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करण्या बाबतही विचार करावा.

आपल्या माहितीसाठी गांधी विचार संस्कार परीक्षेचे परिपत्रक सोबत जोडले आहे.

कळावे.

रयत शिक्षण संस्था सातारा

प्रि. डॉ. भाऊसाहेब कराळे
**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

**प्रत माहितीसाठी सादर ..**
मा. चेअरमन, गांधी रिसर्च फाउंडेशन गांधीतीर्थ, जैन हिल्स, जळगाव ४२५००१
मा. सहसचिव (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था, सातारा
मा. सहसचिव (माध्यमिक), रयत शिक्षण संस्था, सातारा